**सं.फौ.ख.क्र.८६८/२०२०**
**सरकार वि सुनिल**
**नि.१२ खाली**

MHNG100016662020

## न्यायनिर्णय
## (घोषित दि.१० मार्च, २०२६)

अभिलेखावर आलेला पुरावा व दोन्ही बाजुंनी केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझेसमक्ष विचारार्थ उपस्थित होतात. मी माझा निष्कर्ष कारणासह त्यावर खालीलप्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.०६/१०/२०२० रोजी दुपारी १.०० वाजताचे दरम्यान मौजा सोनेगाव लोधी ता.जि.नागपुर येथे सार्वजनिक ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीस 'तुने काय झाटे उपडले तुझ्या पुदीचे कातडे काढीन' अशा अश्लील शब्दात शिवीगाळ केली त्याद्वारे इतरांना त्रास झाला आणि त्याद्वारे भा.द.वी.कलम २९४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| २ | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीस जीवाने मारण्याची धमकी देउन फौजदारीपात्र धाकदडपशा केला, आणि त्याद्वारे भा.द.वी.कलम ५०६ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नाही |
| ३ | आदेश काय? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

२) अभियोग पक्षाने प्रस्तुतच्या प्रकरणात एकुण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली

आहे. साक्षीदार क्र.०१ शंकर अशोकराव पनत, साक्षीदार क्र.०२ मंदाबाई नारायणरावजी बिरे आणि साक्षीदार क्र.०३ गणेश नारायणरावजी बिजे यांची साक्ष नि.क्र.१२ खाली नोंदविली. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी विरूध्द पुरावा मिळुन आल्यामुळे त्याच्या विरूध्द फौ.प्र.सं.चे कलम ३१३ प्रमाणे बयान नि.क्र.१२ खाली नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपींनी सांगितले की, फिर्यादीने खोटी केस दाखल केली आहे.

**<u>मुद्दा क्र. ०१ व ०२ करिता:-</u>**

३) अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद करून सांगितले की अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप हा संशयापलिकडे सिध्द केलेला आहे. फिर्यादी व इतर साक्षीदारांनी एकमेकांशी सुसंगत अशी साक्ष दिलेली आहे. त्यामुळे आरोपीला योग्य ती शिक्षा करावी अशी विनंती केली. याउलट आरोपीचे वकीलांनी युक्तीवाद करून सांगितले की, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये पुर्ववैमनस्य असल्यामूळे आरोपीला फिर्यादीने खोट्या गुन्ह्यात गोवलेले आहे. फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये स्पष्टपणे मान्य केले आहे की, घटनेच्या पुर्वीपासुन आरोपीच्या वडीलांसोबत त्यांचे बोचणे-चालणे बंद आहे. त्यानंतर सा.क्र.३ यांनी देखिल त्यांच्या उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांचे व आरोपीचे बोलणे-चालणे बंद आहे. तसेच सदरची घटना ही दि.०६/१०/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता घडली परंतु, फिर्यादीने सदर घटनेची फिर्याद दि.०७/१०/२०२० रोजी दिलेली आहे. त्यामुळे फिर्यादीने पुर्ववैमनस्यातुन सदरची खोटी फिर्याद आरोपीविरूध्द दिलेली आहे ही बाब सिध्द होते त्यामुळे आरोपीची निर्दोश मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली.

४) फिर्यादी मंदाबाई सा.क्र.२ यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांच्या साक्षीमध्ये घटना दि.०६/१०/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता घडली असे सांगतात. तसेच सदर दिवशी त्या त्यांच्या घरी अंगणात बसुन असतांना आरोपी सुनिल बिरे हा दारू पिउन आला आणि त्यांना जुन्या भांडणाच्या कारणावरून रिपोर्ट का दिली? असे म्हणुन भांडण केले "तु माझ्या नजरेच्या दुर हो, तु येथुन चालली जा, तु दिसली की माझा दिवस खराब

जातो, तु येथुन चालली जा नाही तर तुला जिवाने मारून टाकीन, रिपोर्ट देउन माझे काय बिघडवले, एक दिवस मी तुझ्या पुदीचे कातडे काढीन" अशी शिवीगाळ केल्याचे सांगितले आहे. त्यांनी त्यांच्या फिर्यादमधील मजकुर मान्य केला व आरोपीला खुल्या न्यायालयात ओळखले. त्यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता, त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, घटनेच्या पुर्वीपासुनच त्यांचे आरोपीच्या आईवडीलांसोबत बोलणे–चालणे बंद आहे. सा.क्र.३ गणेश यांनी देखिल त्यांच्या पुराव्यामध्ये घटनेची तारिख व वेळ याबाबत फिर्यादीच्या साक्षीस सुसंगत साक्ष दिल्याचे दिसुन येते. त्यांनी देखिल त्यांच्या साक्षीमध्ये आरोपी व त्यांच्यामध्ये घटनेच्या पुर्वीपासुनच बोलणे–चालणे बंद आहे ही बाब स्पष्टपणे मान्य केलेली आहे.

५) प्रचलित नियमाप्रमाणे आरोपी व फिर्यादीमधील पुर्ववैमनस्य दोन प्रकारचे असु शकते आरोपीला पुर्ववैमनस्याच्या आधारे खोट्या गुन्ह्यात गोवने अथवा आरोपी व फिर्यादी यांच्यातील भांडण हे पुर्ववैमनस्यातुन निर्माण होणे या बबींची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन काळजीपुर्वक करणे क्रमप्राप्त ठरते.

६) फिर्यादी मंदाबाई सा.क्र.२ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये घटनेच्या दिवशी त्या त्यांच्या अंगणात बसुन असतांना, आरोपी आला व त्यांना शिवीगाळ केली असे त्यांच्या सरतपासामध्ये सांगतात. त्यांच्या पुराव्यामधुन प्रकर्षाने दिसुन येते की, फिर्यादी ही घटनेच्या वेळी तिच्या घराच्या अंगणामध्ये बसुन होती. भा.द.वी. चे कलम २९४ प्रमाणे सदरची घटना ही सार्वजणित ठिकाणी अथवा सार्वजणिक ठिकाणाजवळ घडणे अनिवार्य आहे. तसेच आरोपीने सार्वजणिक ठिकाणी शिवीगाळ केल्यामुळे ईतरांना काय त्रास झाला? या बाबीदेखिल अभिलेखावर येणे गरजेचे आहे. परंतु, फिर्यादी ही मान्य केलेल्या तथ्याप्रमाणे सदरची घटना ही तिच्या अंगणात घडल्याचे सांगते. त्यामुळे भा.द.वी.चे कलम २९४ मधील घटकाप्रमाणे सदरची घटना ही सार्वजणिक ठिकाणी अथवा सार्वजणिक ठिकाणाजवळ घडली नसल्याची बाब फिर्यादीच्या साक्षीतुनच अभिलेखावर आल्याचे दिसुन येते.

७) त्यानंतर सा.क्र.३ गणेश यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी देखिल त्यांच्या साक्षीमध्ये घटना ही त्यांच्या घरी अंगणात घडली असल्याचे मान्य करतात. फिर्यादी सांगते त्याप्रमाणे आरोपीने तिला अश्लील शिवीगाळ केली व सदरची घटना ही दि.०६/१०/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता घडली. तर, फिर्यादीने त्याच दिवशी आरोपी विरूध्द पो. स्टे. ला तक्रार का दिली नाही? याबाबत संदिग्धता अभिलेखावर आल्याचे दिसुन येते. फिर्याद नि.क्र.२० चे अवलोकन केले असता त्यामध्ये घटना दि.०६/१०/२०२० रोजी घडल्याचे नमुद आहे. परंतु, सदर घटनेची फिर्याद ही दि.०७/१०/२०२० रोजी दिल्याचे नमुद आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये आरोपीविरूध्द एक दिवस फिर्याद उशीरा का दिली? याबाबत कोणतेही कारण सांगितलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने घटनेच्या दिवशी फिर्याद का दिली नाही? या बाबीमुळे संशय निर्माण झालेला आहे.

८) फिर्यादीने मान्य केलेल्या तथ्याप्रमाणे आरोपी हा त्याचा सख्खा पुतण्या आहे. आरोपीचे व त्यांचे घर एकमेकाला लागुन आहे. तसेच त्यांच्या घराला लागुन इतर ब–याच लोकांची घरे आहेत. परंतु, अभियोग पक्षाने फिर्यादीच्या घराच्या अजुबाजुच्या लोकांची साक्ष घेतलेली नाही. सदरची घटना ही गावामध्ये घडली असल्यामुळे आरोपीने केलेली शिवीगाळ ही घराशेजारिल लोकांनी ऐकली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. जर अभियोग पक्षाने फिर्यादीच्या घराशेजारिल आजुबाजुच्या लोकांची साक्ष अभिलेखावर घेतली असती तर, प्रत्यक्ष वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यास मदत झाली असती. फिर्यादी तिच्या सरतपासामध्ये सांगते की, आरोपी हा घटनेच्या दिवशी दारू पिउन आला होता. परंतु, सदर आरोपी हा दारू पिउन तिच्या घरी आला ही बाब तिने तिच्या फिर्यादमध्ये सांगितलेली नाही. त्यामुळे फिर्यादमधील मजकुर व सरतपासातील साक्ष यामध्ये आमुलाग्र अशी तफावर अभिलेखावर आल्याचे अभिप्रेत होते व संशयाला वाव मिळतो. तसेच सा.क्र.१ शंकर (पंच साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांच्या समक्ष नि.क्र.१४ घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे सांगतात. परंतु, त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे की, ते घटनास्थळावर गेले नव्हते व त्यांच्या समक्ष कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर

**सं.फौ.ख.क्र.८६८/२०२०**
**सरकार वि सुनिल**
**नि.१२ खाली**

त्यांना माहिती नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा देखिल सिध्द झाल्याचे दिसुन येत नाही.

९) एकंदरित अभियोग पक्षाच्या पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता आरोपीने फिर्यादीला 'तुने काय झाटे उपडले तुझ्या पुदीचे कातडे काढीन' अशी शिवीगाळ सार्वजनिक ठिकाणी केली अथवा सार्वजनिक ठिकाणाजवळ केली आणि त्यामूळे इतरांना त्रास झाला तसेच आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी अभियोग पक्षाला संशयापलिकडे सिध्द करता आल्या नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. ०१ ते ०२ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. ०३ साठी खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **सुनिल विठ्ठलराव बिरे** भा.द.वी.कलम २९४,५०६ मधुन फौ.सं.कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीनकदबे व जातमुचलके रद्द करण्यात येतात.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ चे पुर्ततेसाठी आरोपीने रक्कम रूपये १५,०००/– चा वैयक्तीक जातमुचकला व जामीन मुचकला सादर करावा.

४. अभिलेखावर मुद्देमाल नसल्यामुळे त्याबाबत काहीही आदेश नाही.

(न्यायनिर्णय न्यायालयीन वेळेत व खुल्या कक्षात अग्रघोषित करण्यात आला.)

RAVI SATYABHAN MANKAR
order
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.03.12 12:04:26 +0530

उमरेड
दि.१०.०३.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड

सं.फौ.ख.क्र.८६८/२०२०
सरकार वि सुनिल
नि.१२ खाली

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Umred, Dist.Nagpur |
| Presiding Officer | :- | R. S. Mankar |
| Judgment uploaded by | :- | S.B.Ghardinkar (Stenographer L.G) |
| Date of Judgment | :- | 10.03.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 10.03.2026 |